आता सदर योजनेला शासनाने क्र. संकीर्ण/एसटीसी-०१९४/१५०६/प्र.क्र.१०८/परि-१, दिनांक २.५.१९९५ नुसार मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरची बाब पुन्हा सादर केली असता संचालक मंडळाने ठराव क्र. ९५.०३.०६, दिनांक ४.५.१९९५ अनुसार असा निर्णय घेतलेला आहे की, म.रा.मा.प. महामंडळाने विभागाच्या आवश्यकतेसाठी ज्या व्यक्तीच्या जमिनी संपादित केल्या आहेत त्या व्यक्तींच्या कुटुंबातील एका व्यक्तीला रा.प. महामंडळात नोकरी द्यावी.

संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार अशा प्रोजेक्टेड नोकरी देण्यासाठी खालील अटी व शर्ती विहित करण्यात आलेल्या आहेत.

१] राज्य परिवहन महामंडळाने संपादित केलेल्या जमीनीवर मालकी हक्क दाखविणारा-७/१२ उतारा किंवा जास्त व्यक्ती असल्यास त्या सर्व व्यक्तींनी एक मताने त्यांच्या कुटुंबातील ज्या एका व्यक्तीला घटक संवर्ग पदात वर्ग-३ अथवा वर्ग-४ मध्ये नोकरी द्यावयाची आहे त्या व्यक्तीची शिफारस करावी. जमीन वर संयुक्तरित्या धारण केलेली असेल तर अशा सर्व धारकांनी त्यांच्या पैकी एकाची नोकरीकरिता अर्ज करण्यासाठी निवड करावी व त्यानुसार त्यांनी ॲफिडेव्हिट सादर करावे.

२] राज्य परिवहन महामंडळाने ज्या व्यक्तींच्या जमीनी भूसंपादित केलेल्या आहेत, परंतु अशी व्यक्ती कोणत्याही केंद्रशासकीय राज्यशासनात सेवेत असल्यास त्यांना ही योजना लागू होणार नाही.

३] ह्या योजनेखाली नोकरी मागणारी व्यक्ती महामंडळाने घटक संवर्ग वर्ग-३ व वर्ग-४ पदांसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता व इतर अटी व शर्ती पूर्ण करीत असली पाहिजे-- त्याप्रमाणे मंजूर केलेल्या पदासाठी संबंध चिकित्सकांनी सदर व्यक्तीस वैद्यकीयदृष्ट्या पात्र ठरविणे आवश्यक आहे.

४] नियमित स्वरूपाची जागा रिक्त असेल तरच भूसंपादित प्रकरणी नोकरी दिली जाईल व अशी नोकरी प्रथमतः दोन वर्षांकरिता करार पद्धतीवर (कॉन्ट्रॅक्ट बेसिस) केली जाईल. सदर संपादित जमीनी विषयी रा.प. च्या विरोधात कोर्टात प्रकरण चालू असेल किंवा जाण्याची शक्यता असेल तर सदरची नेमणूक पुढे चालू राहणार नाही.

५] ज्या राज्य परिवहन प्रकल्पग्रस्तांची १०० टक्के शेत जमीन राज्य परिवहनाच्या आस्थापनेसाठी संपादित केलेली असेल त्यांचे बाबत राज्य परिवहन सेवा भरतीसाठी असलेली कमाल वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथिल करण्यात यावी.

६] नोकरी मिळणे संदर्भात राज्य परिवहन प्रकल्पग्रस्त व्यक्तींच्या कुटुंबामध्ये ज्याची जमीन संपादित केली आहे ती व्यक्ती किंवा त्या व्यक्तीने प्राधिकृत केलेली व प्रकल्पग्रस्त व्यक्तीवर अवलंबून असणारी व्यक्ती यांचा समावेश असेल. त्या प्रकल्पग्रस्त व्यक्तीवर अवलंबित व्यक्तींमध्ये पत्नी, मुलगा, मुलगी यांचा समावेश राहील व ती व्यक्ती अज्ञान असल्यास [illegible] बाब समजण्यात येईल. संबंधित जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या दाखल्याचे आधारे राज्य परिवहन प्रकल्पग्रस्त व्यक्ती किंवा प्रकल्पग्रस्त व्यक्तीवर अवलंबित व्यक्ती ठरविली जाईल.

.....